# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१६ नोव्हेंबर, २०१३ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची ७ वी बैठक दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मालदार एन. एन.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. - संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ.चिट्टे जी.एन. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ.देशमुख ए.एल. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| ७) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| ८) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ९) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| ११) | प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. | सदस्य |
| १३) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १४) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १५) | श्री. सपाटे एम. जी. | सदस्य |
| १६) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १७) | कु. कोरे पी. पी. | सदस्या |
| १८) | श्री. शिंदे एम. बी. | सदस्य |
| १९) | डॉ. अवताडे एच. के. | सदस्य |
| २०) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २१) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २२) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| २३) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २४) | डॉ. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| २५) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २७) | डॉ.बारबोले ए.एन. | सदस्य |
| २८) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| २९) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| ३०) | डॉ. श्रीमती आपटे एस. एस. | सदस्या |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३१) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ३२) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३३) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३४) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३५) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ३६) | श्री. व्हनकळस डी. डी. | सदस्य |
| ३७) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ३८) | श्री. सलगर बी.एस. | सदस्य |
| ३९) | प्राचार्य श्री. जमादार के.एम. | सदस्य |
| ४०) | डॉ. वडगावकर पी. पी. | सदस्य |
| ४१) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४२) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४३) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ४४) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ४५) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ४६) | डॉ. उबाळे व्ही. पी. | सदस्य |
| ४७) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ४८) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ४९) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५०) | डॉ. नारायणपेठकर ए. बी. | सदस्य |
| ५१) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५२) | श्री. धोंगडे वाय. ए. | सदस्य |
| ५३) | श्री. माळी एस. के. | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी अधिसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. नव्याने निवड झालेल्या मा.कुलसचिव यांची अधिसभेची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा.कुलगुरु यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले तसेच कु. प्रिती कोरे, अध्यक्ष, विद्यापीठ विद्यार्थी परिषद, श्री. महेश शिंदे, सचिव, विद्यापीठ विद्यार्थी परिषद, श्री. यशवंत धोंगडे, अक्कलकोट नगरपरिषद आणि श्रीमती पद्मजादेवी पाटील, जिल्हा परिषद शिक्षण समिती सदस्य यांचे स्वागत करुन सभागृहाला ओळख करुन देण्यात आली.

त्याचप्रमाणे डॉ. डी. जे. साळुंखे यांची परीक्षा नियंत्रक पदावरील मुदत दि.३१/१२/२०१३ रोजी संपत असल्याने त्यांना मध्यांतरानंतर पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

डॉ. अशोककुमार ई. एन., डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. डॉ. एम. कृष्णमूर्ती, श्री. नलवडे पी. आर. संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ, श्री. वाघमोडे एस. ए., श्री. डोंगरे एम. एस., श्री. कोकरे एम. बी. यांनी पत्राद्वारे आणि प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए., डॉ. श्रीमती दळवी आर. जे., डॉ. काशीद एस. एस., आमदार कु. शिंदे पी. एस., आमदार श्री. शिंदे बी. व्ही., श्री. शेळके बी. बी. व डॉ. गवळी आर. एस., मा. विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) यांनी आणि आमदार दिपकराव साळुंखे-पाटील यांच्या स्वीय सहायकाने आमदार साळुंखे-पाटील यांची दूरध्वनीवरुन अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थिती कळविली. त्यानुसार त्यांच्या अनुपस्थितीस मान्यता देण्यात आली. याशिवाय अधिसभेच्या या बैठकीस मा. प्र. सहसंचालक (तंत्र शिक्षण), मा. संचालक (DMER), प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी., प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए., श्री. गांधी आर. एच., आमदार श्री. पाटील सी. बी., आमदार श्री. साळुंखे-पाटील डी. बी., श्री. देशपांडे ए. व्ही., श्री. शिंदे आर. बी., श्रीमती जमादार एम. पी., श्रीमती पाटील एस. एन., श्री. रुपनर बी. ए., श्री. घागरे एम. व्ही., श्रीमती पाटील पी. पी. हे अधिसभा सदस्य अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना सहाव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**अे) क्रिडा विभाग:**

१. "पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ" बास्केटबॉल आणि व्हॉलीबॉल मुलींच्या स्पर्धा हेमचंद्रा विद्यापीठ, गुजरात आणि राजस्थान विद्यापीठ, जयपूर येथे होणार असून सोलापूर विद्यापीठाने दिनांक ०८.१०.२०१३ पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे सराव शिबीराचे आयोजन केले.

२. "आखिल भारतीय आंतरविद्यापीठ" स्विमिंग मुले / मुली स्पर्धा दिनांक २५/१०/२०१३ ते २९/१०/२०१३ रोजी गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथे झाल्या असून सोलापूर विद्यापीठ मुलाच्या संघातून श्री. केतन शिंदे यांनी एक मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये सुवर्ण व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये रौप्य पदक मिळविले तर याच स्पर्धेत मुलींच्या संघामधून कु. स्वाती विडप हिने एक मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये रौप्य पदक आणि हायबोर्ड डायव्हिंग मध्ये रौप्य पदक मिळविले. आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्विमिंग मुले/मुलींच्या "जनरल चॅम्पीयनशिप ट्रॉफीचा" बहुमान विद्यापीठास प्राप्त झाला.

३. "महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रिडा स्पर्धा" सन २०१३-१४ ह्या आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दिनांक २७/११/२०१३ ते दिनांक ०१/१२/२०१३ या कालावधीत होणार असून यामध्ये सोलापूर विद्यापीठाचे पाच संघ सहभागी होणार असून सदर स्पर्धेत सराव शिबीराचे आयोजन दयानंद महाविद्यालय सोलापूर येथे दिनांक १५/११/२०१३ पासून करण्यात आले आहे.

**बी) एन. एस. एस., डी. एस. डब्ल्यु. विभागः**

१. सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना "सल्लागार समितीची बैठक" दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी मा. कुलगुरुमहोदय यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध मुद्यावर चर्चा करण्यात आली.

२. सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात मार्च २०१३ अखेर एकूण ३७ राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित महाविद्यालयाचे "विशेष श्रम संस्कार शिबीर" संपन्न झाले.

३. दिनांक ०२/०६/२०१३ ते दिनांक ११/०६/२०१३ दरम्यान **"आव्हान-२०१३"** राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातून एकुण ११२० स्वयंसेवक / स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. सोलापूर विद्यापीठातून एकूण ३१ जणांचा संघ सहभागी झाला होता. सदर कार्यक्रमामध्ये सोलापूर विद्यापीठाला "उत्कृष्ट विद्यापीठ" आणि उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून श्री अक्षय हिरेमठ, सिंहगड इन्स्टिट्युट, केगांव आणि "संघनायक" प्रा. पंकज पवार, लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी, वडाळा यांना पुरस्कार प्राप्त झाले.

सन २०११-१२ चे "राज्यस्तरीय पुरस्कार" मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात सोलापूर विद्यापीठास प्रदान करणेत आले. (दिनांक ०४/०६/२०१३)

   १. राष्ट्रीय सेवा योजना "महाविद्यालयीनस्तर पुरस्कार" श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.
   २. उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना "कार्यक्रम अधिकारी" म्हणून डॉ.रामेश्वर रावसाहेब कोठावळे, शिवाजी महाविद्यालय, बार्शी.
   ३. राष्ट्रीय सेवा योजना "उत्कृष्ट स्वयंसेवक" पुरस्कार श्री पंकज विलास पवार, लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी, वडाळा, सोलापूर.

४. समर्थ भारत अभियानातंर्गत पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राज्यस्तरीय पुणे ते पंढरपूर "हरित ऊर्जा दिंडी आणि कन्यारत्न वाचवा" अभियान दिंडीचे आयोजन ०२ जुलै ते १९ जुलै, २०१३ या कालावधीत करण्यात आले. यामध्ये संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत एकूण ०५ स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.

५. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर व लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिक लोकसंख्या दिनांचे" औचित्य साधून दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी भव्यजागरण दिंडीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सोलापूर शहरातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयातून एकूण १०० स्वयंसेवक / स्वयंसेविकांनी तसेच कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.

६. राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दि.२७/०७/२०१३ ते दि.०२/०८/२०१३ या कालावधीत एकूण १०० स्वयंसेवकांचे "विशेष श्रमसंस्कार शिबीर" संपन्न झाले. शिबीरादरम्यान विद्यापीठ परिसरामध्ये एकूण १२०० वृक्षारोपण करण्यात आले.

७. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दिनांक ०१ ऑगष्ट, २०१३ रोजी "विद्यापीठाच्या वर्धापनदिनाचे" औचित्य साधून "रक्तदान शिबीराचे" आयोजन केले होते. यामध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कर्मचारी मिळून एकूण ५० व्यक्तींनी आपले रक्तदान केले.

८. पदार्थविज्ञान संकूलाच्यावतीने दिनांक १५ ऑगष्ट, २०१३ रोजी संकुलाच्या समोरील व डाव्या बाजूस अंदाजे ४० "वृक्षारोपण कार्यक्रम" मा. कुलगुरु महोदय व विद्यापीठाच्या इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थित संपन्न झाला.

९. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातर्फे "युवा महोत्सवात" सहभागी होणाऱ्या विद्यार्थी कलाकारांना युवा महोत्सवातील विविध कलाप्रकारांची ओळख होण्याच्या दृष्टीने प्रति महाविद्यालय दोन मुली व दोन मुले सहभागी करुन त्यांच्याकरीता दिनांक २४/०८/२०१३ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० अखेर "एक दिवसीय कार्यशाळेचे" आयोजन करण्यात आले.

१०. विद्यार्थी कल्याण मंडळ विभागामार्फत "सृजनरंग नियतकालिक स्पर्धा परीक्षेत" एकूण ४२ महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला होता. तज्ञांच्या परीक्षणानुसार प्रथम क्रमांक हिराचंद नेमचंद महाविद्यालय सोलापूर, द्वितीय क्रमांक कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर आणि तृतीय क्रमांक संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर तर "व्यावसायिक महाविद्यालय" गटात वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांना प्रथम, नागेश करजगी ऑर्कीड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांना द्वितीय आणि ब्रम्हदेवदादा माने अभियांत्रिकी महाविद्यालय, बेलाटी यांना तृतीय क्रमांकाने घोषित केले. विजेत्या महाविद्यालयांचा "विद्यापीठ वर्धापना" दिवशी सत्कार करण्यात आला.

११. सन २०११-१२ या वर्षाचा राष्ट्रीय सेवा योजना "विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण" सोहळा दिनांक १३/०९/२०१३ रोजी मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. श्रीमती निशिगंधा माळी तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. श्रीकांत येळेगांवकर, विद्यापीठाचे पदाधिकारी यांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कार्य करणारे उत्कृष्ट महाविद्यालय, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांचा गौरव करण्यात आला. त्याचवेळी सन २०१३-१४ या वर्षाची सर्व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांची कार्यनियोजन बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना संदर्भात विविध विषयांवर चर्चा झाली. सदर बैठकीस एकूण १०२ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांपैकी ६७ अधिकारी उपस्थित होते.

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दिनांक २१ ते २३ सप्टेंबर, २०१३ या कालावधीमध्ये "पुर्व राष्ट्रस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबीर" संपन्न झले. सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत एकूण ०५ स्वयंसेवक, ०५ स्वयंसेविका व ०१ संघव्यवस्थापक यांनी सहभाग नोंदविला.

१३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सोलापूर विद्यापीठ, सर्व संलग्नित महाविद्यालयामध्ये ०२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती निमित्त आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस साजरा करण्यात आला.

१४. विद्यार्थी कल्याण विभागातर्फे आयोजित "दहाव्या युवा महोत्सवाचे" आयोजन लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी महाविद्यालय, वडाळा येथे दिनांक २१/०९/२०१३ ते दिनांक २४/०९/२०१३ दरम्यान करण्यात आले होते. युवा महोत्सवात विविध कलाप्रकारात एकूण ६४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला, युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचे मानकरी प्रथम क्रमांक श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी तर द्वितीय क्रमांक वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर आणि तृतीय क्रमांक संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांना घोषित करण्यात आले.

१५. दिनांक १५/१०/२०१३ रोजी "विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या" अध्यक्ष व सचिव पदासाठीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये कुमारी प्रिती प्रभाकर कोरे, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप यांची अध्यक्षपदी तर श्री शिंदे महेश भिमराव, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी यांची सचिवपदी निवड झाली.

१६. दिनांक ०१ जून, २०१३ रोजी "विद्यार्थी कल्याण संचालक" पदी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालय, सोलापूर येथील प्राध्यापक श्री प्रशांत नलावडे यांची निवड झाली असून मावळते संचालक डॉ. संजय नवले यांच्याकडून त्यांनी कार्यभार स्विकारला.

**सी) वित्त व लेखा विभाग:**

१. विद्यापीठाकडे असलेल्या सर्व मालमत्तेचा व इमारतीचा Chola MS General Insurance यांच्याकडून विमा उतरविण्यात आला आहे.

२. विद्यापीठाचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे "संवैधानिक लेखापरिक्षण" मे. संकपाळ कुलकर्णी ॲन्ड असोसिएट्स, कोल्हापूर यांनी पूर्ण केले.

३. विद्यापीठाचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरिक्षणानंतर "लेखापरिक्षीत वार्षिक लेखे" दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

४. विद्यापीठाच्या नवव्या पदवीदान समारंभाच्या ऑनलाईन अर्ज प्रक्रियेसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी व ॲक्सीस बँक, शाख डफरीन चौक, सोलापूर येथे बचत खाते उघडण्यात आले असून "ऑनलाईन फी" स्वीकारण्यात आली.

५. विद्यापीठातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांकरिता विद्यापीठ व सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी यांच्यामार्फत "वैयक्तिक संगणक / लॅपटॉप खरेदी कर्ज योजना" (₹३०,०००/-) अंतर्गत अंदाजे एकूण ५० सेवकांना कर्ज वितरीत करण्यात आले असून उर्वरित सेवकांना कर्ज वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

६. विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे वेतन अनुदान योजनेतर योजना (Non Plan) या लेखाशिर्षकाखाली तरतुद करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

**डी) परीक्षा विभाग:**

१. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील वार्षिक व सत्र पध्दतीने विविध अभ्यासक्रमांच्या एकूण २६५ परीक्षा दिनांक ०६/०५/२०१३ ते दिनांक १६/०६/२०१३ या कालावधीत संपन्न झाल्या असून प्राध्यापकांनी परीक्षेच्या कामावर टाकलेला बहिष्कार ९६ दिवसानंतर मागे घेतल्याने मूल्यमापनाच्या कामास गती आली असून सर्व विद्याशाखेचे निकाल वेळेत प्रसिद्ध करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

२. परीक्षा विभागाकडून बहि:स्थ विद्यार्थ्यांची २०१३-१४ या शैक्षणिक वर्षातील "प्रवेश प्रक्रिया" पूर्ण करण्यात आली.

**ई) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ विभाग:**

१. एकूण ७० प्राध्यापकांकडून प्राप्त झालेले "संशोधन प्रकल्प" विद्यापीठ अनुदान आयोग पश्चिम विभागीय कार्यालय पुणे व नवी दिल्ली यांच्या कार्यालयास पाठविण्यात आले आहेत.

२. एकूण ३२ विषयांच्या "संशोधन व मान्यता समितीच्या बैठका" दिनांक २५/०४/२०१३ ते दिनांक ०७/०७/२०१३ या कालावधीत विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाल्या.

३. "विशेष कक्ष विभागाकडे" (सहाय्यक प्राध्यापक पदासाठी) एकूण ८३६ इतक्या मागासवर्गीय उमेदवारांनी नांव नोंदणी केलेली आहे.

४. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता विद्यापीठातील विविध संकुल अधिविभागातील आणि संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी प्रवेश परीक्षा दिनांक ०५ ते ०७ जून, २०१३ रोजी सोलापूर / पंढरपूर / बार्शी / कोल्हापूर / सातारा या केंद्रावर घेण्यात आली. सदर प्रवेश परीक्षेस एकूण १,९९३ विद्यार्थी बसले होते. सन २०१३-१४ मधील संलग्नित महाविद्यालयातील बी.बी.ए./ बी.सी.ए. / बी.एस्सी (ई.सी.एस.) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा फॉर्म ऑनलाईनद्वारे स्विकारण्यात येऊन सदर अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा दि.२२/०६/२०१३ रोजी घेण्यात आली.

५. एकूण २५६ जागेसाठी "पी.एच.डी. प्रवेश परीक्षा" घेण्यासाठी जाहिरात वर्तमानपत्रामध्ये दिनांक २३/०६/२०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. यंदा विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी विद्यापीठाने प्रथमच "ऑनलाईनद्वारे अर्ज" करण्याची प्रक्रिया अवलंबली. त्यास अनुसरुन एकूण १,२०३ विद्यार्थ्यांकडून अर्ज प्राप्त झाले आहेत.

६. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून सर्व विद्याशाखा अंतर्गत "सुधारित अभ्यासक्रम" सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आलेले असून ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले.

**एफ) कुलसचिव कार्यालय (सामान्य प्रशासन विभाग):**

१. डॉ. नितिन सोनजे यांनी कुलसचिव पदाचा दिलेला राजीनामा स्वीकारण्यात आला व त्यांना दिनांक ०५/०४/२०१३ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. सदर कुलसचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे, संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला व त्यांनी तो स्विकारला.

२. विद्यापीठाकडे रिक्त असलेल्या कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी पदांची जाहिरात दिनांक २३/०४/२०१३ रोजी प्रसिद्धीस देण्यात आली होती. त्यास अनुसरुन प्राप्त आवेदनांची छाननी करण्यात आली. "कुलसचिव" या रिक्त पदावर पात्र उमेदवारांची दिनांक ०७/०७/२०१३ रोजी मुलाखत आयोजित करुन निवड समितीने श्री एस. के. माळी यांची सोलापूर विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी शिफारस केली. त्याप्रमाणे त्यांना आदेश पारित केले. श्री. एस. के. माळी हे विद्यापीठाच्या सेवेत दिनांक ११/०७/२०१३ रोजी रुजू झाले आहेत.

३. सोलापूर विद्यापीठात माहे नोव्हेंबर, २०११ ते दिनांक माहे जुलै, २०१२ या कालावधीत करण्यात आलेल्या शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकरणी "शासन नियुक्त चौकशी समितीने" (डॉ. अभय वाघ, डॉ. गायकवाड व श्रीमती डॉ. निळेकर) दिनांक २९/०४/२०१३ रोजी विद्यापीठास भेट देऊन सविस्तर चौकशी केली.

४. विद्यापीठातील सन २००४-०५ ते सन २०११-१२ या कालावधीमधील वेतन अनुदान निर्धारण अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामध्ये एकूण १९ वर्ग १ व २ अधिकाऱ्याचे वेतन अमान्य करण्यात आले आहे त्यापैकी एकूण १२ अधिकाऱ्यांचे बाबत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०९ मे, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत पारीत झालेल्या ठराव क्र.०२ अन्वये विद्यापीठाने मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) पुणे यांच्याकडे संबधितांचे प्राप्त झालेले अपिल दिनांक १३/०५/२०१३ रोजी पाठविण्यात आले आहे.

५. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता "आदर्श शिक्षक पुरस्कारा" संदर्भात शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १५/०५/२०१३ रोजी नव्याने सुचित केल्याप्रमाणे संबधित शिक्षकाकडून सुधारित शिक्षक प्रस्ताव मागवून मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०५/२०१३ रोजी बैठक घेऊन एकूण ०४ शिक्षकांचे प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई येथे दिनांक ०३/०६/२०१३ रोजी हस्तपोच दाखल करण्यात आले आहेत.

६. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ अन्वये, विद्यापीठाच्या प्रस्तुत संकुलात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता "तात्पुरती शिक्षकीय पदे" भरण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी एकूण उपलब्ध कार्यभाराची समीक्षा करुन तात्पुरत्या शिक्षक पदासाठी कार्यभार निश्चित करुन दिला असून त्या अनुषंगाने दिनांक २१/०६/२०१३ रोजी निवड समितीने प्रक्रिया पूर्ण केली.

७. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१३ रोजीच्या अधिसुचनेनुसार, विद्यापीठाच्या विविध संकुलातील शिक्षकांना "कॅस मधून पदोन्नती" देण्यासंदर्भात अर्ज मागविण्यासाठी परिपत्रक पारित करण्यात आले.

८. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या कालावधीत विद्यापीठाकडील विविध संकुल / अधिविभागाकडे प्रवेश परीक्षा दिलेल्या प्रथम आणि द्वितीय असे मिळून एकूण ८२९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला असून प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती / फ्रीशीपचे फॉर्म ऑनलाईन भरुन घेण्यात आले.

९. विद्यापीठ परिसरामधील भूशास्त्र संकुलाच्या इमारतीचे बांधकामापोटी येणे असलेली रक्कम ₹१८,४१,६९१/- (रुपये अठरा लाख एक्केचाळीस हजार सहाशे एक्यानऊ फक्त) धनादेश क्र. ५०२१९७ दि. ०९/०७/२०१३ अन्वये मा.कार्यकारी अभियंता, सार्वाजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झाली.

१०. विद्यापीठासमोरील राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या सुरक्षा रक्षक केबीन व संरक्षक भिंतीच्या भरपाईपोटी एकूण ₹२,७४,२५२/- (रुपये दोन लाख चौऱ्याहत्तर हजार दोनशे बावन्न फक्त) इतकी रक्कम धनादेश क्र.११९८३७ दि.१३/०८/२०१३ अन्वये विद्यापीठास प्राप्त झाली आहे. नव्याने सुरक्षा रक्षक केबीनचे काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

**जी) परिसंवादः**

१. प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १८ मार्च ते दिनांक २१ मार्च, २०१३ अखेर Remote Sensing....... of Museology Antiquity या विषयावर प्रा. चेतन हुलसुरे या अभ्यागत व्याख्यात्याचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आले.

२. महिला जाणीव जागृती या सदराखाली स्त्रीविषयक विविध विषयांच्या संदर्भात जाणीव जागृती व्हावी म्हणून शिक्षणशास्त्र संकुलात दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी "एकदिवसीय राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक परिसंवाद" आयोजित करण्यात आला.

३. पर्यावरणशास्त्र विभागात "Environmental Disaster Mangement for Sustainable Development" राष्ट्रीय परिसंवाद २८ मार्च, २०१३ रोजी संपन्न झाला.

४. सामाजिकशास्त्रे संकुलाच्यावतीने दिनांक २५ व २६ एप्रिल, २०१३ रोजी "मिडीया ॲन्ड सोसायटी" या विषयावरील "दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे" आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रासाठी इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, नवी दिल्ली यांनी तीन लाख रुपयांचा निधी दिला. या चर्चासत्राकरिता देशातील एकंदर ११० प्रतिनिधी व तज्ञ उपस्थित होते.

५. दिनांक ०६ ऑगष्ट, २०१३ रोजी इलेक्ट्रॉनिक्स विभागाने संकुलाकडे "एकदिवसीय कार्यशाळेचे" [Workshop on MATLAB and Simulink] या विषयावर आयोजन करण्यात आले.

६. संगणकशास्त्र संकुलाच्या वतीने दिनांक २१-२३ सप्टेंबर, २०१३ दरम्यान संख्याशास्त्र विषयाच्या "राष्ट्रीय कार्यशाळेचे" आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत आर मिनीटॅब व मॅटलॅब या संगणकप्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेत विविध राज्यातून एकूण ८० संशोधक व विद्यार्थी सहभागी झाले.

७. रसायनशास्त्र संकुलामध्ये विद्यापीठस्तरीय दोन दिवसांची कार्यशाळा दिनांक २७ व २८ सप्टेंबर, २०१३ रोजी "Microscale technique for separation and identification of organic mixtures" या विषयामध्ये आयोजित करण्यात आले. संकुलातील जवळपास ६० विद्यार्थ्यांनी सदरच्या कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

८. सामाजिकशास्त्रे संकुलातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ रोजी "महाराष्ट्राच्या विकासाची दिशा" या विषयावर "एकदिवसीय कार्यशाळेचे" आयोजन केले होते. या कार्यशाळेत प्रा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, नागपूर व श्री रविंद्र मोकाशी यांनी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

९. शास्त्र आणि तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली यांचे विद्यमाने कॉम्प्युटेशनल संकुल संख्याशास्त्र विभागामार्फत दिनांक १९ ते २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी "New Horizons of Statistics" या विषयावर तीन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्रास विविध राज्यातून १५ आमंत्रित व्याख्याते, ४५ संशोधक आणि अनेक संशोधक विद्यार्थी सहभागी होते.

१०. सोलापूर विद्यापीठाच्या वतीने दिनांक १९/१०/२०१३ रोजी अल्पसंख्यांकांसाठी "Issues & Concerns of Minority Education Institutions" या विषयावर "चर्चासत्राचे" आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्रास मा. श्री. पी. ए. इनामदार, सदस्य, अल्पसंख्यांक विकास समिती, भारत सरकार व अध्यक्ष महाराष्ट्र कॉसमोपोलीशन एज्युकेशन सोसायटी, पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

११. सोलापूर विद्यापीठ व बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला २०१३" अंतर्गत दिनांक १९/१०/२०१३ रोजी डॉ.भालचंद्र कानगो, जनरल सेक्रेटरी भारतीय कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद यांचे "चीनची अर्थव्यवस्था व बदलता चीन" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानास विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**एच) संकुलेः**

१. सामाजिकशास्त्रे संकुलाकडे दिनांक ३०/०८/२०१३ रोजी डॉ. जी. एस. कांबळे आणि डॉ. रविंद्र चिंचोलकर लिखित "मिडिया ॲन्ड सोसायटी" या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. चंद्रकांत गुडेवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

२. प्रा. डॉ. एल. पी. देशमुख, संचालक पदार्थ विज्ञान संकुल यांना लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटीकडून मानाच्या "शिक्षकरत्न पुरस्काराने" दिनांक ०८/०९/२०१३ रोजी सन्मानित करण्यात आले.

३. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा कलम ४० (२) (b) व विद्यापीठ परिनियम ४४६ नुसार दिनांक २५/०९/२०१३ रोजी "विद्यापीठ विद्यार्थी मंडळाची" स्थापना होऊन स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस मधील श्री निळ प्रकाश हरी यांची विद्यापीठाच्या अधिविभागाचे सचिव म्हणून बिनविरोध निवड झाली.

४. दिनांक ०७/१०/२०१३ रोजी आकांक्षा प्रा. लि. पुणे व नोवेनमेश प्रा. लि., पुणे या कंपन्यांनी कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले होते.

५. सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे संकुल, ग्रामीण विकास विभागाच्या विद्यमाने दिनांक १५/१०/२०१३ रोजी "आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिना" निमित्त सोलापूर जिल्ह्यातील एकूण ११ ग्रामीण महिला सरपंचांना सोलापूर जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मनिषा देसाई यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

**आय) ग्रंथालय:**

१. ग्रंथालयामधील SLIM सॉफ्टवेअर देखभालचे वार्षिक करार आणि J-Gate Data base खरेदी करण्याचे काम पूर्ण झाले.

२. ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता २६ कॉम्प्युटरयुक्त "इंटरनेट लॅबची" सुविधा पूर्णत्वास आली असून ती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**जे) इतर व युजीसी:**

१. विद्यापीठ परिसरात दिनांक २५/०३/२०१३ रोजी "डाक कार्यालयाचे" कामकाज सुरु झाले.

२. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व बाभूळ स्टडी ॲन्ड मॅनेजमेंट इन्स्टिट्युट, सांगोला यांच्याबरोबर वेडीबाभुळ संशोधनासाठी दिनांक २१/०६/२०१३ रोजी करारनामा करण्यात आला.

३. दिनांक ०१ ऑगस्ट, २०१३ रोजी "विद्यापीठाचा नववा वर्धापन दिन" समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, पिंपरी पुणे या विद्यापीठाचे माननीय कुलपती तथा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा. डॉ. के. बी. पोवार सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

४. "भारतीय स्वातंत्र्य दिना" निमित्त १५ ऑगस्ट, २०१३ रोजी मा. कुलगुरु महोदय यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला यावेळी विद्यापीठाच्या संकुलातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर सेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

५. विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.9-17/2004 (CPP-1/PU) dt. 23/05/2013 अन्वये, सोलापूर विद्यापीठास "१२ ब" दर्जा प्राप्त झाला असून त्यामुळे सोलापूर विद्यापीठास व विद्यापीठ परिक्षेत्रातील १२४ महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून

विविध योजनामधून निधी प्राप्त होण्यासाठी व केंद्रीय विविध वित्तिय संस्थांची द्वारे खुली झाली असून सर्व शैक्षणिक संस्थाचा विकास होण्यास मदत होणार आहे.

६. सोलापूर विद्यापीठास १२ ब मान्यता प्राप्त झाल्यानंतर दोन महिन्यात सविस्तर चर्चा, सल्लामसलत, बौद्धिक संवाद च्या अनेक बैठकीमध्ये सोलापूर विद्यापीठाचा १२ व्या पंचवार्षिक योजनाचा आराखडा (सन २०१२ ते २०१७) काटेकोरपणे तज्ञ समिती व विद्यापीठ प्रशासनाने तयार कला. सदर अंदाजे ₹१३६ कोटीचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना विद्यापीठाचे पत्र क्र.सोविसो / २०१३-१४ / ३७५३, दिनांक २८/०८/२०१३ अन्वये दिनांक २९/०८/२०१३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

७. संतोष भिमराव पाटील कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, मंद्रुप आणि माऊली महाविद्यालय, वडाळा यांना "१२ ब आणि २ एफ" चा दर्जा प्राप्त झाला.

८. मारुतीराव हरीराव महाडिक कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, मोडनिंब या महाविद्यालयाचे २ (फ) व १२ (ब) आणि वसुंधरा कला महाविद्यालय जुळे सोलापूर या महाविद्यालयास १२ (ब) दर्जा प्राप्तीसाठी प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयास पाठविण्यात आले.

९. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर आणि विज्ञान महाविद्यालय, सांगोला यांचा १२ ब संदर्भातील प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.१६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या सहाव्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणीः सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/१३५०७, दि.२१ मार्च, २०१३ अन्वये, दि.१६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या सहाव्या सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.१८/०४/२०१३ अशी होती. मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, प्रशासनाकडून खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहे.

**दुरुस्ती विषय क्र. १) पान क्र. १/१४ वर, अ.क्र. ११ "प्राचार्य डॉ. धुत्तरगाव एस. सी." याऐवजी "प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी." अशी व पान क्र. ३/१४ वरील पहिल्या ओळीतील "सत्कार" ऐवजी "स्वागत" अशी दुरुस्ती करावी.**

सबब, वरील दुरुस्तीसह अधिसभेचा दि.१६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या सहाव्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

ठरावः **अधिसभेच्या दि.१६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून वरील दुरुस्तीसह कायम करण्यात आला.**

**[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.**

(टिपणीः परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र सोबत जोडले आहे).

ठरावः **अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:३२ वाजता सुरु झाला व सर्व प्रश्नोत्तरे संपल्याने दुपारी ०१:२८ वाजता प्रश्नोत्तराचा तास संपला.**

**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**

**[ ३ ] सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

श्री. गायकवाड बी. आर. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालावरील आक्षेप व लेखापरीक्षण अहवाल अंतिम करण्यासाठी समान लेखा संहिता (Common Account Code) तरतुद क्र.1.50 (h) नुसार मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालील उपसमिती गठीत केली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा. एस. व्ही. लोणीकर | : | अध्यक्ष |
| २) | श्री. बी. आर. गायकवाड | : | सदस्य |
| ३) | डॉ. एन. बी. पवार | : | सदस्य |
| ४) | श्री. एम. एस. रोकडे | : | सदस्य, सचिव |

या समितीने दि.११/०९/२०१३ रोजी बैठक घेवून लेखापरीक्षण अहवालाबाबत सविस्तर चर्चा केली व त्यावर अभिप्रायासह त्यांचा अहवाल वित्त व लेखा विभागाकडे सादर केला. उपसमितीने सुचित केल्याप्रमाणे लेखापरीक्षण अहवालाबाबत कार्यवाही करुन तो व सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५(२) (छ) (४) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.११/१०/२०१३ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.०५ अन्वये सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(२)(ड.) नुसार व लेखापरीक्षण अहवाल त्याच्या अनुपालन अहवालातील सुधारणांसह व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणेस शिफारस करण्यात आली.

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.१९/१०/२०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारात सादर केली असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

ठराव : सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाची वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येऊन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०१२-१३ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: श्री. गायकवाड बी. आर. यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

| | |
|---|---|
| **१) श्री. रिसबूड एस. एच.** | **५) प्राचार्य श्री. राजमाने एन. आर.** |
| **२) डॉ. रोंगे बी. पी.** | **६) डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| **३) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल.** | **७) डॉ. शिंदे एस. व्ही.** |
| **४) डॉ. बचुटे एम. टी.** | **८) श्री. चौगुले एस. एस.** |

**यांनी विचार मांडल्यानंतर सन २०१२-१३ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप व त्याबाबत कार्यालयाने केलेली पूर्तता यावर चर्चा झाली. अधिसभा सदस्य श्री. रिसबूड एस. एच. यांनी असहमती (Dissent) दर्शविल्याने सदर प्रस्ताव बहुमताने मान्य करण्यात आला.**

**[ ४ ]** **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण संचालकांकरिता राष्ट्रीय पात्रता चाचणी विद्यापीठाने आयोजित करावी किंवा त्यांना या अटितून मुक्त करण्याकरिता विद्यापीठाने यु.जी.सी./शासनास विनंती करण्याची शिफारस अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ५ ]** **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सामाजिक शास्त्र विषयाकरिता इम्पॅक्ट फॅक्टर असणारी पुरेशी जर्नलस् भारतातून प्रसिध्द होत नसल्याने संशोधन मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांना अशा जर्नल मधून लेख छापून आणण्याची घातलेली अट रद्द करावी अशी शिफारस अधिसभा विद्यापरिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ६ ]** **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठातंर्गत संशोधन करणाऱ्या संशोधकांकरिता आकारल्या जाणाऱ्या शुल्क रचनेची पूर्नरचना करावी अशी शिफारस अधिसभा विद्यापीठ शुल्क समितीस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ७ ]** **अधिसभा सदस्य डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठ अधिविभाग व सलग्नीत महाविद्यालयातील जे विद्यार्थी कला, क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना, व विद्यापीठाच्या इतर स्पर्धेमध्ये परीक्षेच्या काळात सहभागी होतात अशा विद्यार्थ्यांची परीक्षा स्वतंत्रपणे घेण्याचा ठराव ही अधिसभा परीक्षा मंडळास शिफारस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांच्या वतीने श्रीमती विभूते एस. बी. यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. चौगुले एस. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्रीमती विभूते एस. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ८ ]** **अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध कामकाजात सहभागी असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याची शिफारस ही अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बाड. डी. आर. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ९ ]** **अधिसभा सदस्य डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठातून शिक्षण घेताना द्विपदवी देण्याबाबतची सोय उपलब्ध करुन देण्याबाबतचा ठराव ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १० ]** **अधिसभा सदस्य डॉ. बाड डी. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

आपल्या विद्यापीठास यु.जी.सी. कडून १२ 'ब' चा दर्जा मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव ही अधिसभा मांडत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ११ ]** **अधिसभा सदस्य डॉ. भोसले यु. व्ही. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यार्थी व कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांना विद्यापीठा ये / जा करीत असताना विद्यापीठाच्या गेटसमोर राष्ट्रीय महामार्गवर अनेक लहान, मोठे अपघात झालेले आहेत. याचा विचार करता त्या ठिकाणी भुयारी मार्ग असणे आवश्यक आहे. भूयारी मार्ग हरेण्याकरिता विद्यापीठाने पाठपूरावा करावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री.गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १२ ]** **अधिसभा सदस्य श्री. चौगुले एस. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयातील ज्या प्राध्यापकांची सेवा १० वर्षाहुन जास्त झालेली आहे व ज्यांना पीएचडी करावयाची आहे त्यांचेसाठी PET ची सक्ती नसावी पीएचडी प्रवेशामध्ये त्यांचेसाठी किमान २५% जागा राखीव असाव्यात अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. आवताडे एच. के. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १३ ] अधिसभा सदस्य डॉ. बचुटे एम. टी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठातील विविध विभाग व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये संशोधन करणारे विद्यार्थी, शिक्षक यांची संख्या मोठी आहे. पदव्यूत्तर विद्यार्थी ही संशोधन प्रकल्पावर काम करत असतात. या सर्वांना संशोधन विषयक साहीत्य, प्रकल्प तयार करणे, शोध निबंध लेखन या बाबतीत योग्य माहिती या सर्वांना मिळावी यासाठी विद्यापीठामध्ये 'ॲकॅडेमीक रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर' असणे गरजेचे आहे.

विद्यापीठामध्ये 'ॲकॅडेमीक रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर' सुरु करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. भोसले यु. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. बचुटे एम. टी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १४ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

बी. ए. भाग-१ आणि बी. ए. भाग-२ या पाठ्यक्रमाकरिता बहिस्थ (external) विद्यार्थ्यांना मानसशास्त्र (Psychology) विषय उपलब्ध करुन देण्यासाठी ही अधिसभा विद्या परिषदेस शिफारस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. गायकवाड आर. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १५ ] अधिसभा सदस्य डॉ. बारबोले ए. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठ सोविसो/ परीक्षा विभाग / परिपत्रक / २०१३ / ५७७, दि.१८ जून २०१३ च्या संदर्भांकीत पत्रानुसार अभियांत्रिकी व विधी शाखा वगळून इतर विद्याशाखांना हे परिपत्रक लागू केलेले आहे. सदरच्या परिपत्रकामुळे अनुऊत्तीर्ण होणाऱ्या व आक्टोबर / नोव्हेंबर सत्रासाठी फॉर्म भरु इच्छिनाऱ्या विद्यार्थ्यांवर प्रचंड अन्याय झाला आहे. सदरचे परिपत्रक त्वरीत मागे घेवून सर्व विद्यार्थ्यांना समान न्याय द्यावा व अन्याय थांबवावा अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा मंडळास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. चौगुले एस. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १६ ] अधिसभा सदस्य डॉ. बारबोले ए. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ व विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्य व प्राध्यापक निवड समितीतील कांही सदस्यांनी विद्यापीठ नियमांची व आचार संहीतेची पायंमल्ली करुन नियमबाह्य नेमणूका व नेमणूकीसाठी शिफारसी केल्या आहेत. अशा सर्व विद्यापाठातील व विद्यापीठाने नेमलेल्या सदस्यांची चौकशी करण्यासाठी व त्यांचेवर कारवाई करणेसाठी समिती गठीत करुन चौकशी करावी अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस ही अधिसभा करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिकी कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. बारबोले ए. एन. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १७ ] अधिसभा सदस्य डॉ. बारबोले ए. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

PET - परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका काढून घेवू नयेत. तसेच त्यांना उत्तरपत्रिकेची एक प्रत द्यावी व पेटच्या (PET) च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे विद्यापीठाच्या वेबसाईटवर निकालापूर्वी टाकावीत पारदर्शकता यावी यासाठी ही अधिसभा परीक्षा मंडळाला वरीलप्रमाणे शिफारस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १८ ] अधिसभा सदस्य प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

फार्मसी हा स्वतंत्र आरोग्यविज्ञानाचे महत्वाचे शाखा असून फार्मसीला आंतराष्ट्रीय पातळीवर व देशातील अनेक विद्यापीठात स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा मिळाला आहे. आपल्या विद्यापीठात फार्मसीला स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा मिळावा. या अनुषंगाने स्वतंत्र फार्मसी विद्याशाखेची स्थापना करण्यात यावी असा ठराव अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. रिसबूड एस. एच. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत प्राचार्य श्री. पाटील आर. वाय यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १९ ] अधिसभा सदस्य प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाकडून घेण्यात येणाऱ्या आंतरिक परीक्षांचे गुण ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्याची तरतूद करण्यात यावी असा ठराव अधिसभा परीक्षा मंडळास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ २० ] अधिसभा सदस्य प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात संशोधनसाठी NMR, LCMS, GCMS, HPLC, GC, IR, UV, X-RAY CRYSTALLOGRAPHY इत्यादी अद्यावत उपकरणे असलेली स्वतंत्र **"Instrument Centre"** विद्यापीठात निर्माण करावी असे ठराव अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ २१ ] अधिसभा सदस्य प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

नवीन शैक्षणिक वर्ष प्रारंभ होण्यापूर्वी त्यावर्षी संलग्नीकरणाचे नुतनीकरण, विस्तारीकरण झालेल्या महाविद्यालयांचे नांवे प्रसिध्द करण्यात यावा असा ठराव अधिसभा परीक्षा मंडळास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

**जोडपत्र "अ"**

**विषय क्र. ०२ चे सहपत्र**

**अधिसभेच्या शनिवार दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे**

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | |
| ● | **डॉ. चव्हाण सी. एस.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १ | अधिसभा सदस्याने विद्यापीठ प्रशासनास एखादी माहिती मागितल्यास ती किती दिवसात देणे अपेक्षित आहे? | किती दिवसात द्यावी या संदर्भात नियमात कोणतीही तरतूद नाही. |
| | | ● अशा सामान्य प्रश्नांनादेखील उत्तरे मिळायला अधिसभा सदस्यांना एवढा वेळ लागत असेल तर सामान्य प्राध्यापकांचे व इतरांचे कसं होणार? काही ना काही मुदत तर घातलीच पाहिजे. | संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना जर आपण भेटलात तर त्याचवेळेस आपले शंका निरसन ऑन द स्पॉट माहिती उपलब्ध असेल तर केली जाते आणि गोपनीय माहिती असेल तर एखादा ठराविक कालावधी देवून तुमचे जे काही शंका असेल त्याचं समाधान प्रशासन करु शकतं. संबंधित अधिकाऱ्यांना भेटून तुमची जी काही प्रश्न / शंका असेल तर त्याचे समाधान करणं योग्य आहे. |
| | | ● विद्यापीठाकडे गोपनीय माहिती असते का? | होय. |
| | | ● नियमामध्ये अशी तरतूद नाही असं जे उत्तर मिळालेलं आहे. त्यात कुठले नियम refer करायचे हे बघण्यासाठी की ज्याच्यात तरतूद नाही? | विद्यापीठ परिनियमाप्रमाणे. |
| | | ● विद्यापीठाचे स्वत:चे अंतर्गत नियम याबाबतीत नाहीत का? | ते तयार करण्याची प्रोसेस चालू आहे. |
| | २ | ए. जी. पी. ९००० करिताचे प्लेसमेंट विद्यापीठाने केलेले नाही. तरी त्याकरिता प्लेसमेंट कॅम्प केंव्हा घेण्यात येणार आहे? | विद्यापीठाने ए. जी. पी. ७००० / ८००० करिताचे प्लेसमेंट दिनाक ०६/०९/२०१२ ते ०७/०९/२०१२ दरम्यान केलेले आहे.<br>AGP ९००० चे प्लेसमेंट केलेले आहे. |
| | | ● यासंदर्भात माझं स्वत:चं ९००० चं प्लेसमेंट का झालेलं नाही?<br>● | विद्यापीठाने दि.०६/०९/२०१२ ते ०७/०९/२०१२ दरम्यान AGP ९००० च्या तीन लोकांचे प्लेसमेंट केलेले आहे. |
| | ३ | रिसर्च प्लेसकरिताची काही आर्थिक तरतूद केली आहे का? | होय. |
| | | ● काय केलेली आहे? | रु.५,००,०००/- तरतूद करण्यात आली आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • रिसर्च प्लेसला ती कशा पद्धतीने वाटप करणार? | संबंधित महाविद्यालयांमधून जे अर्ज प्राप्त होतील त्यातून विद्यापीठाची फी विद्यापीठाला जाईल व बाकीची फी संबंधित रिसर्च प्लेसला ठेवण्याचं धोरण ठरलेलं आहे. यासंदर्भात संबंधित प्रशासनाकडून आदेश ज्या त्या महाविद्यालयाला किंवा रिसर्च प्लेसला निर्गमित करण्यात येतील. |
| | | • या रु.५,००,०००/- तरतूदीतून रिसर्च फीचा काही संबंध येतो का? | नाही. |
| | | • तरतूद ही वेगळीच असणार आहे ना त्याचा संबंध येतो का? | नाही. |
| | | • किती सेंटर्सनी आपल्याला आर्थिक मदत मागितलेली आहे? | सध्या एकही नाही. |
| | | • रिसर्च स्टुडंटची फी जी विद्यापीठात भरलेली आहे त्याच्या मधून काही रिसर्च प्लेस असणाऱ्या ठिकाणच्या कॉलेजला काही पैसे मिळणार आहेत का? आर्थिक मदत होणार आहे का? | यासंदर्भात नवीन नियमावली करण्याकरिता समिती नेमलेली आहे. नियमावली तयार करण्याचं काम चालू आहे की महाविद्यालयांना काही वाटा त्यातून देण्यात यावा. |
| | | • जी महाविद्यालये अशा पध्दतीची आर्थिक मदत मागेल त्यांना देणार की त्या त्या ठिकाणी रिसर्च प्लेस आहे त्या प्रत्येकाला विभागून देणार? | ज्यांचे प्रस्ताव येतील त्याप्रमाणे priority ने विचार केला जाईल. |
| • | **<u>श्री. कोकरे एम. बी. यांच्या वतीने श्रीमती विभूते एस.बी.</u>** | | **<u>ॲड. सलगर बी. एस.</u>** |
| | ४ | वाणिज्य विद्याशाखा व विज्ञान विद्याशाखा अधिष्ठातांची नेमणूक कोणत्या अधिकारात केली आहे?<br><br>• असा पदभार कोणत्या नियमानुसार दिलेला आहे?<br><br>• नेमणूक का केली नाही?<br><br>• Dean ची नेमणूक Faculty तून की Standing मधून? | विज्ञान विद्याशाखा आणि वाणिज्य विद्याशाखा अधिष्ठातांची नेमणूक केलेलीच नाही. त्यांना फक्त पदभार देण्यात आलेला आहे. नवीन नेमणूक केलेली नाही.<br>विद्यापीठाचं काम अडू नये विद्यार्थ्यांचं नुकसान होवू नये म्हणून पदभार दिलेला आहे. नवीन नेमणूक होईपर्यंत.<br>स्टँडींग कमिटीची मिटींग होऊन ती नेमणूक करावी लागते. मिटींग होईपर्यंत पदभार दिलेला आहे.<br>Standing Committee मधून. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | ५ | सन २०१३ या वर्षात स्थायी समिती मार्फत विविध अधिकार मंडळावरील किती रिक्त पदे भरलेली आहेत व कोणकोणती? | सन २०१३ या वर्षात आतापर्यंत एकही पद भरण्यात आलेले नाही. |
| | ६ | विद्यापीठातील विविध अधिकार मंडळावरील कोणकोणत्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले आहे?<br>• हे करताना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ पालन केला का?<br>• परिनियम S-655 ला छेद दिलेला आहे का?<br>• यापैकी कोणत्या sub-clause नुसार या सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले आहे? | १) डॉ. भिमाशंकर बिराजदार<br>२) सौ.मिनाक्षी कदम<br>३) डॉ. ए. बी. सूर्यवशी<br>४) डॉ. श्रीमती उषा सासनूर<br>होय<br>नाही<br>महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ४४ (ई) नुसार. |
| | **<u>डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांच्या वतीने डॉ. बचुटे एम. टी.</u>** | | **<u>डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.</u>** |
| | ७ | कोणकोणत्या महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत?<br>• का झालेली नाही? याबाबत विचारणा केली का? | दोन अनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा<br>त्यातील काही जे नियम आहेत, त्यानुसार पूर्तता झाली नसेल ती प्रोसेस आहे ती चालू आहे. थोड्या कालावधीनंतर त्या नेमणूका प्रोसेसप्रमाणे कायदेशीर असतील तर त्या केल्या जातील. |
| | ८ | सोलापूर विद्यापीठामध्ये सर्व विद्याशाखांचे अनुदानित पदवीत्तर पदवी विभाग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही सुरु आहे?<br>• या पाठीमागे School of Life Sciences साठी प्रस्ताव दिलेला आहे याचा उल्लेख मागच्या सभेमध्ये केलेला होता. त्याबाबतचा यामध्ये उल्लेख कसा काय नाही?, म्हणजे त्याबाबतचा प्रस्ताव गेला आहे की नाही? प्रोग्रेस मध्ये आहे किंवा काय? | विद्यापीठात भाषा व वाङ्मय संकुल, स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि वाणिज्य व व्यवस्थापन संकुल अनुदानित तत्त्वावर सुरु करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत.<br>School of Technology मध्ये School of Life Sciences चा अंतर्भाव केलेला आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • वाणिज्य व व्यवस्थापन संकूल सुरु करण्याचा प्रस्ताव पाठविलेला आहे, परंतु आता चालू असलेला एम.बी.ए. का बंद करण्यात आला आहे? | प्रत्येक वर्षी एम.बी.ए. ची परिस्थिती जी काही आहे ती वेगळी असते. एम.बी.ए. पूर्णपणे बंद झालेला आहे असा त्याचा अर्थ नाही. ह्या वर्षासाठी विद्यार्थी संख्या जी काही आहे ती कमी असल्यामुळे तात्पुरतं त्याला discontinuation जे काही म्हणतो आपण ते केलेले आहे पण याचा अर्थ एम.बी.ए. पूर्ण बंद केलेले आहे असा नाही. त्याला revival जे काही आहे ते आपण एकदा परत प्रस्ताव मांडल्यानंतर ते revive होवू शकते. या वर्षी ते चालविणे कुठल्याही आर्थिक परिस्थितीमध्ये ते शक्य नव्हतं. That can not be called as totally disconitued. That can be revived. तुम्ही एकदा प्रस्ताव पाठवल्यानंतर. |
| | | • कुठल्याही प्रकारे आर्थिक विषय म्हणता, विद्यापीठ हे काय profit making organization आहे का? | विद्यापीठ profit making organization नसलं तरी definitely it is not a loss making organization also. At least Cost bearing जे काही आहे ते थोडसं तरी बघावं लागतं. आणि त्या दृष्टीकोनातून त्यावेळेचा जो निर्णय घेतलेला आहे. आणि बाकी बऱ्याच अशा गोष्टी आहेत, नियमाच्या दृष्टीकोनातून की ज्यामुळे ते करावं लागलं. |
| | **<u>डॉ. कोळेकर टी. एन.</u>** | | **<u>डॉ. सूर्यवंशी एस. एस.</u>** |
| | ९ | सोलापूर विद्यापीठ सोलापूर ने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला या आर्थिक वर्षात कोणत्या जातीची किती रोपे दिली आहेत? | सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सागवान या जातीची एकूण २५०० रोपे दिली. |
| | | • सदर रोपे बनविण्यासाठी विद्यापीठाला काही खर्च आला आहे काय? | नाही. |
| | | • रोपे मोफत दिली गेली आहेत काय? | होय. |
| | १० | सोलापूर विद्यापीठाने वाहन क्र. MH-13 AZ-9531 खरेदी करताना वित्त व लेखा समितीचे शासकीय प्रतिनिधी सदस्य यांनी विद्यापीठास हरकतीचे पत्र दिले होते, त्याचा आशय काय? | सोलापूर विद्यापीठाच्या कार्यालयीन वापराकरिता वाहन क्र. MH-13 AZ-9531 खरेदी करण्यासाठी विद्यापीठ शासन नियमानुसार सक्षम आहे का? असा आशय होता. |
| | | • हे वाहन कशासाठी वापरले जाते? | विद्यापीठाच्या कार्यालयीन वापरासाठी. |
| | | • सदरचे वाहन खरेदी करताना शासकीय नियमानुसार केले आहे काय? | होय. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | ११ | डिसें २०१२ ते जाने २०१३ मधे सोलापूर विद्यापीठामार्फत राज्य शिक्षक पुरस्कारासाठी कोणकोणत्या शिक्षकांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यात आले होते, त्यांचे गुणदान तक्त्यासह गुण किती? | सोलापूर विद्यापीठामार्फत सन २०१२-१३ च्या राज्य शिक्षक पुरस्कारासाठी खालील शिक्षकांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यात आले होते. त्यांचा गुणदान तक्त्यासह गुण खालीलप्रमाणे: |

| | १) डॉ. तानाजी नारायण लोखंडे, सहयोगी प्राध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | १५ |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १४ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०५ |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्द्दी | १५ | ०८ |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | १५ |
| | एकूण | १०० | ८२ |

| | २) डॉ. शरद शिवाजी सूर्यवंशी, सहयोगी प्राध्यापक, पदार्थविज्ञान संकूल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | १५ |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १६ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०५ |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्द्दी | १५ | ०५ |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | १५ |
| | एकूण | १०० | ८१ |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | | |

| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
|---|---|---|---|
| | ३) डॉ. तानाजी नारायण कोळेकर, सहायक प्राध्यापक, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर | | |
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | १० |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १४ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०० |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्दी | १५ | १० |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | १५ |
| | एकूण | १०० | ७४ |

४) डॉ. सूर्यकांत बाळासाहेब घुगरे, सहयोगी प्राध्यापक, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, जि.सोलापूर

| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | ०५ |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १६ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०० |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्दी | १५ | १५ |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | ०५ |
| | एकूण | १०० | ६६ |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • आकडा १ आणि ६ मध्ये काय फरक आहे? | महाराष्ट्र शासनाच्या राज्य शिक्षक पुरस्कारासंदर्भातील दि.२६/१२/२०१२ व दि.१५/०५/२०१३ अन्वयेच्या निकषानुसार हे तयार केलेले आहे आणि समिती गठीत केलेली आहे आणि समितीने त्याप्रमाणे गुण दिलेले आहेत. |
| | | • यासाठी कुठले शिक्षक पात्र आहेत का? | यादी दिली आहे. |
| | | • पुरस्कार कोणाला मिळाला आहे? | डॉ. तानाजी नारायण लोखंडे, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांना हा पुरस्कार मिळाला आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. शिंदे एस. व्ही.** | | **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | १२ | विद्यापीठ परिक्षेत्रातील कोणकोणत्या महाविद्यालयात प्रोफेसरची पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे?<br>● २०१० पासून शासनाने वेगवेगळी परिपत्रके काढून तात्काळ ताबडतोब भरण्यात यावी अशी सूचना केलेली आहे. त्याप्रमाणे विद्यापीठामध्ये Joint Director कडून पदे मंजूर करुन घेण्यात आली आहेत तरीसुद्धा अजून पूर्ण का प्रोसेस झाली नाही ?<br>● ही प्रक्रिया कधी पूर्ण होईल त्याला काही Time-limit आहे का? | कोणत्याही महाविद्यालयात प्रोफेसरची पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.<br>त्याची प्रक्रिया सुरु आहे. विद्यापीठाने प्रस्ताव मागवून घेतले आहे. त्या प्रस्तावाचा API ची तपासणी चालू आहे. काही प्रमाणात ते झालेले आहे.<br>लवकरात लवकर पूर्ण होईल. |
| | १३ | प्रोफेसरची पदे भरताना CAS व Direct भरतीचे निकष तयार करण्यात आले आहेत काय?<br>● निकष तयार न करता API चे मोजमाप कसे केले? | नाही.<br>API UGC च्या Guidelines नुसार तपासून ठेवण्यात आले आहे. |
| | १४ | प्रोफेसरच्या भरतीमध्ये राखीव जागांबाबत नियमावली तयार केली आहे काय?<br>● त्यामध्ये राखीव जागा नाहीत का नियमावली केलेली नाही?<br>● विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातंर्गत एकूण महाविद्यालयात प्राध्यापकाची किती पदे रिक्त आहेत? | नाही.<br>नियमावली केलेली नाही. शासनाकडे मार्गदर्शनासाठी पाठविले आहे.<br>रिक्त पदे किती आहेत याबाबत Joint Director सोलापूर विभाग हे निश्चित करते. प्रत्येक महाविद्यालयात Associate Professor ची पदे आहेत त्याच्या १/१०$^{th}$ पदे ही मान्य होतात. त्यापैकी २५% पदे Direct भरतीची आहे आणि २५% पदे पदोन्नतीने भरण्याची आहेत. |
| ● | **श्री. गायकवाड आर. एस.** | | **डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.** |
| | १५ | किती संलग्नीत महाविद्यालयात शारिरीक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत? | दोन अनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | १६ | किती महाविद्यालयात शारिरीक शिक्षण संचालकाना नियत वयोमानानुसार वाढ दिलेली नाही?<br>● ते कोणते महाविद्यालय ? | एका महाविद्यालयात.<br>संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा. |
| | १७ | विद्यापीठात शारिरीक शिक्षण विभाग करण्यासंबंधी कोणते प्रयत्न झाले आहेत?<br>● का सादर करण्यात आलेला नाही? | विद्यापीठात शारीरिक शिक्षण विभाग सुरु करण्यासंबंधी प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.<br>इतर प्रस्ताव सध्या सादर केलेले आहेत. त्यामुळे additional प्रस्ताव त्याठिकाणी मान्य होईल की नाही या दृष्टीकोनातून तो सादर केलेला नाही आणि सध्या तरी तो विचाराधीन नाही पण पुढे तो कदाचित विचाराधीन राहील. |
| ● | **डॉ. भोसले यु. व्ही.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १८ | विद्यापीठ परीक्षांचे निकाल लागल्यानंतर विविध वर्गांचा निकाल किती टक्के लागलेला आहे. याची माहिती सर्व संबंधित महाविद्यालयांना पाठविली जाते काय?<br>● Ledger बरोबर पाठविले जाते का? | होय.<br>होय, लेजर बरोबरच पाठविली जाते. |
| | १९ | विद्यापीठ परीक्षांचे निकाल लागल्यानंतर पदवी व पदव्युत्तर वर्गांची गुणवत्ता यादी महाविद्यालयांना कळविली जाते काय?<br>● स्वतंत्रपणे कळविली जाते का? लेजरसहित?<br>● शिक्षणशास्त्र विद्याशाखेतंर्गत बी. एड., बी. पी. एड. ची गुणवत्ता यादी उपलब्ध आहे का? | होय.<br>होय, स्वतंत्रपणे कळविली जाते.<br>होय |
| | २० | बी. ए. भाग दोन या वर्गासाठी आयडी एस् विषयांसाठी वेगवेगळ्या ऐच्छिक विषयांचे गट तयार केले आहेत काय?<br>● कोणकोणते ऐच्छिक विषयाचे गट केलेले आहेत?<br>● हे गट कशाच्या निकषाच्या / आधारावर केले आहे? | होय, केलेले आहेत.<br>यामध्ये History / HSRM, Geography / Tourism, Political Science / Public Administration, Optional Languages ला Linguistics तुम्ही घेवू शकता.<br>विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार व महाविद्यालयाच्या सोयीनुसार व परीक्षा घेण्याच्या दृष्टीने सोयीस्कर. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • Economics ला कुठला आय. डी. एस. आहे?<br>• History ला ? | Economics ला आय.डी.एस. HSRM.<br><br>Co-operation / HSRM. |
| | **श्री. चौगुले एस. एस.** | | **श्री. गायकवाड बी. आर.** |
| | २१ | विद्यापीठासमोर राज्य परिवहन मंडळाच्या बसेस थांबल्या पाहिजेत यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्न केले गेले आहेत काय?<br>• काय केले आहेत? | होय.<br><br>महामंडळाला दि.२५/०४/२०१३ व दि.१६/०५/२०१३ रोजी पत्र दिलेले आहे. |
| | २२ | विद्यापीठामार्फत केल्या जाणाऱ्या कामाच्या निविदा मागविण्याचे नियम काय आहेत?<br>• नियम काय आहेत?<br>• असं असेल तर विद्यापीठात BSNL चे टॉवर उभारले याकरिता निविदा मागविली होती काय? | समान लेखा संहितेत नियम आहेत.<br><br>महाराष्ट्र शासनाने दि.०१ एप्रिल, २०१२ पासून प्रस्तावनेतील बाबी विचारात घेवून समान लेखा संहिता लागू करण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे. त्याचं बंधन आपल्यावर घातलेलं आहे.<br>BSNL एकमेव उत्पादक आहे. यासाठी टेंडर काढण्याची आवश्यकता नाही. |
| | २३ | निवीदा न मागविता २०१२-१३ या वर्षात विद्यापीठाने कोणकोणती कामे केली आहेत?<br>• विद्यापीठात कोबाचे काम केलेले आहे त्याचं Tender Procedure झाल्यानंतर हमीपत्र दिले आहे. वर्क ऑर्डर दिल्यानंतर त्याची पूर्तता करुन घेतलेली आहे का?<br>• समान लेखा संहितेचा अवलंब सोयीस्कररीत्या केला जातो का?<br>• Common Accounting Code आणि त्याच्या विद्यापीठास applicable असलेल्या provisions ची अंमलबजावणी / स्विकार as per Convenience घेतला जातो का? | एकही काम केलेले नाही.<br><br>मागच्या वेळी आपणांस सांगितलेली आहे की, अशा काही घटना घडल्या आहेत. आपण आता यापुढे स्टॅम्प दिल्याशिवाय वर्क ऑर्डर देऊ नये अशा ऑर्डर देण्यात आलेली आहे आणि त्यानुसार कार्यवाही चालू आहे.<br><br>नाही.<br><br>नियमानुसार घेतला जातो Convenience नुसार नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. बचुटे एम. टी.** | | **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | २४ | विद्यापीठास १२ ब चा दर्जा मिळाल्यानंतर विद्यापीठाने, विद्यापीठ अनुदान मंडळाकडून अनुदान प्राप्त करण्यासाठी कोणकोणते प्रस्ताव दाखल केले आहेत? | विद्यापीठास १२ ब चा दर्जा मिळाल्यानंतर विद्यापीठाने, XII$^{th}$ Five Year Plan General Development Assistance या अंतर्गत Scenario I नुसार अंदाजे रु.१३६ कोटी, Scenario II नुसार अंदाजे रु.२२४ कोटीचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली येथे अनुदान प्राप्तीसाठी दि.२९/०८/२०१३ रोजी दाखल करण्यात आला आहे. |
| | २५ | वेगवेगळ्या अधिकार मंडळावरील सदस्य सलग कीती बैठकांना गैरहजर असल्यास त्यांचे सदस्यत्व रद्द केले जाते? | पूर्वपरवानगीशिवाय लागोपाठच्या तीन बैठकींस. |
| | | • असे काही सदस्य आहेत का? | आहेत. |
| | | • त्यांचे सदस्यत्व रद्द केले आहेत का? | होय. |
| | | • त्या सभासदांची नावे सभागृहासमोर सांगता येतील काय? | प्रशासनाकडून घेऊन नंतर सांगण्यात येईल. |
| | | • पूर्वपरवानगी न घेता प्राचार्य रोंगे इंग्रजी अभ्यासमंडळावरील सदस्य एकाहीवेळी बैठकीस हजर राहिलेले नाहीत. त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली? | माहिती घेवून सांगण्यात येईल. |
| | २६ | विद्यापीठात जुन २०१४ पासून कोणकोणत्या विषयांचे पदव्यूत्तर विभाग सुरु केले जाणार आहेत? | जे विषय / संकूल यांना अनुदानित तत्त्वावर शासन मान्यता मिळेल ते विषय / संकुल जून २०१४ पासून विद्यापीठात पदव्युत्तर विभाग म्हणून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | | • हे उत्तर specific आहे का? | होय. |
| | | • कोणकोणते विषय / डिपार्टमेंटस? | यापूर्वीच सांगितलेले आहे, भाषाशास्त्र, टेक्नॉलॉजी आणि कॉमर्स त्यातील ज्यांना मान्यता मिळेल ते चालू करण्यात येतील. |
| | | • इतर विषय जसे की life science? | मा.कुलगुरुंनी यापूर्वीच सांगितले की, हा विषय school of technology मध्ये आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. बाड डी. आर.** | | **ॲड. सलगर बी. एस.** |
| | २७ | सन २००८-०९ ते सन २०११-१२ अखेर विद्यापीठाने भरती केलेल्या स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे?<br>● अस्थायी संख्या किती आहे? | सन २००८-०९ ते सन २०११-१२ अखेर विद्यापीठाने भरती केलेल्या स्थायी कर्मचाऱ्यांची संख्या (१५७-४१) ११६ आहे.<br>Nil आहे. |
| | २८ | विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या बैठका वेळेवर घेतल्या जातात काय? | होय. |
| | २९ | विद्यापीठाने भरती केलेले व शासनाच्या लेखापालाने वेतन अमान्य केलेले कर्मचारी कायद्यानुसार अपात्र आहेत काय?<br>● याबाबत विद्यापीठाचे स्पष्ट मत काय आहे व अमान्य केलेले कर्मचारी अपात्र आहेत का?<br>● वेतन अमान्य ही बाब न्यायप्रविष्ट नाही व विद्यापीठाच्या अहिताची आहे त्यामुळे त्यांना वेतन दिले जाते त्याबद्दलचे विद्यापीठाचे मत काय आहे?<br>● वेतन अमान्य झालेल्या किती व्यक्ती आहेत? | याबाबत मा. संचालक (उ. शि.) पुणे यांचेकडे अपील सादर केले असून अपीलाचा निर्णय अप्राप्त आहे.<br>विद्यापीठाने सर्वांचे वेतन मान्य करावे असे recommendation केलेले आहे. अपात्र आहेत असे धरल्यानंतर हे अपात्र नाहीत म्हणून विद्यापीठाने मा.शिक्षण संचालकांकडे अपील केलेले आहे.<br>शासन निर्णय घेईपर्यंत विद्यापीठ त्यांचं वेतन देणार.<br>वेतन अमान्य झालेल्या १९ व्यक्ती आहेत त्यापैकी विद्यापीठाने १२ व्यक्तींचे अपील सादर केले आहे. |
| | **श्री. शिंदे आर. बी. यांच्या वतीने श्री. चौगुले एस. एस.** | | **ॲड. सलगर बी. एस.** |
| | ३० | सोलापूर विद्यापीठास नागरिकांची सनद (Public Charter) लागू आहे काय?<br>● त्याची अंमलबजावणी आहे काय? | सोलापूर विद्यापीठास नागरिकांची सनद (Public Charter) लागू आहे.<br>आहे. |
| | ३१ | विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण देणाऱ्या केंद्रामध्ये अध्यापन करणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक आर्हता काय आहे? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | ३२ | विद्यापीठ भरतीप्रक्रियेत यापूर्वीच्या कुलसचिव पदाच्या अर्जाची छानणी करतांना हेतूपूरस्कर अपात्र उमेदवारांची छानणी करुन विद्यापीठाच्या नियमांचा भंग केल्या प्रकरणी संबंधीत छाणनी व निवड समितीवर काय कारवाई केली? | अपात्र व्यक्तीची निवड केली असे अजून ठरलेले नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न निर्माण झालेला नाही. प्रकरण प्रलंबित आहे. |
| | | • वेतन अमान्य केले आहे असा संबंधित अधिकाऱ्याने निकाल दिला आहे असे असताना नेमके काय प्रकरण प्रलंबित आहे? | ज्यांचे वेतन अमान्य केले आहे ते चुकीचे आहे म्हणून मा. शिक्षण संचालकांकडे अपील केले आहे की यांचे वेतन मान्य करावे. |
| | | • छाननी समितीने व निवड समितीने नियमाप्रमाणे काम केले नसल्यास विद्यापीठ कारवाई करणार का? | पुढे काय होईल त्यामुळे याचे उत्तर देता येणार नाही. |
| | | • ज्यांचे वेतन अपात्र ठरविले आहे ज्यावर University म्हणते की त्यांचा निर्णय चुकीचा आहे यासाठी University कडे कोणता कायदेशीर ठोस पुरावा आहे? | दाखविलेल्या त्रुटी चुकीच्या आहेत आणि हे पात्र आहेत असे शिक्षण संचालकांकडे दाखविले आहे व अपीलही केलेले आहे. |
| • | **डॉ. बारबोले ए. एन.** | | **डॉ. सूर्यवंशी एस. एस.** |
| | ३३ | विद्यापीठातील अथवा विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राध्यापक अथवा कर्मचारी निवडतांना विद्यापीठातील कार्यरत अधिकारी व विद्यापीठाने नियुक्त केलेल्या निवड समिती सदस्यांनी विद्यापीठाचे नियम, आचारसंहीता व मार्गदर्शक तत्वे विचारात न घेता नियबाह्य काम केले आहे काय? | नाही. |
| | | • तत्कालीन कुलसचिव डॉ. सोनजे व वेतन अमान्य झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका समितीने नियमाप्रमाणे केलेल्या आहेत का? | होय. |
| | | • नियमाप्रमाणे काम केले नाही अशा प्रकारचे पुरावे दिल्यास कारवाई करुन कारवाईची बाब पुढील सिनेट मीटिंगपुढे देणार का? | अहवाल प्राप्त झाल्यावर यावर बोलता येईल. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | ३४ | विद्यापीठातील सहाय्यक, सहयोगी अथवा व प्राध्यापक या पदावरील नियुक्त कर्मचाऱ्याना युजीसी, महाराष्ट्र शासन व विद्यापीठाने प्राधिकरणात मंजूर करुन सर्वांना लागू केलेल्या नियमांतील तरतुदीनुसार एक वर्ष परिविक्षाधीन (Probation) कालावधी साठीचा नियुक्ती आदेश दिला आहे का?<br>• नियमबाह्य २ वर्षासाठी दिलेला प्रोबेशन आदेश (Order) दुरुस्त करण्यासाठी काय कार्यवाही चालू आहे?<br>• यु.जी.सी.च्या नियमाप्रमाणे आपण सहावा वेतन आयोग आपल्याला लागू झालेला आहे. विद्यापीठाने, महाराष्ट्र शासनाने तो स्विकारलेला आहे आणि त्या पद्धतीने कामकाज चालू असताना सुद्धा इतर विद्यापीठाप्रमाणे एक वर्षाची प्रोबेशन कालावधी ऑर्डर का दिलेली नाही? | नाही.<br>स्टॅट्यूटमध्ये १ वर्षाची तरतूद नाही. स्टॅट्यूटमध्ये दुरुस्ती झाल्यानंतर त्याप्रमाणे अंमलात आणला जाईल.<br>विद्यापीठ स्टॅट्यूटमध्ये तशी तरतूद नाही. ती अंमलात आणल्यानंतर दिला जाईल. |
| | | • यामुळे आता जे नवीन सेवेत आहे त्यांना आपण दोन वर्षाचा प्रोबेशन पिरेड लागू आहे असे होत नाही का? | आपल्या विद्यापीठात ज्या नेमणूका झालेल्या आहेत त्या २०१० किंवा २०११ या साली झालेल्या आहेत. त्यांचा प्रोबेशन कालावधी हा यावर्षी पूर्ण होणार आहे. त्यामुळे त्यांना मागील तारखेपासून नेमणूक देणे चुकीचे होईल.नवीन कोणतीही ऑर्डर दिली नाही त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही. |
| | ३५ | विद्यापीठ अनुदान आयोगाची व संबंधीत राज्य सरकारची मान्यता असलेल्या एखाद्या खाजगी विद्यापीठाची पीएच्.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी (त्याच विद्यापीठातंर्गत) मान्यता (Guideship) मिळविणे नियमबाह्य आहे काय? | नाही |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • बाहेरच्या विद्यापीठातील प्राध्यापकांनी आपल्याकडे जर अर्ज केला तर गाईडशिप त्याची अमान्य केली जाते त्याला दिली जात नाही असे निदर्शनास आले आहे हे बरोबर आहे का?<br><br>• काही विषयामध्ये अशी तरतूद आहे म्हणजे अशा गाईडला बाहेरची मान्यता दिली आहे तिथं अनेक गाईड आहेत बाहेरच्या विद्यापीठातील प्राध्यापकांना मान्यता दिली आणि त्या विषयामध्ये गाईडची संख्या कमी आहे. उदा. वनस्पतीशास्त्रामध्ये संख्या कमी आहे. बाहेरच्या विद्यापीठातील लोकांचे अर्ज आलेले आहेत. त्यांना मंजूरी दिली जात नाही आणि विद्यार्थी वंचित राहतात. तर त्याबाबत काही स्पष्टीकरण देता येईल का? | आपल्या विद्यापीठाचे गाईड रेकग्निशनचे जे नियम आहेत त्यानुसार गाईड हा विद्यापीठ परिक्षेत्रातील असावा. त्यामुळे केलेले नियम बदलावे लागतील किंवा त्याला नाही म्हणून सांगावे लागेल. आपल्याला असे दाखवावे लागेल की ज्या गाईडने अर्ज केला आहे त्याची अत्यंत आवश्यकता आहे त्या विषयामध्ये आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रात कोणीही गाईड उपलब्ध नाही त्यांना आपण मान्यता देतो.<br>ज्याठिकाणी गाईड उपलब्ध नसेल त्याठिकाणी आपण संबंधित बी. ओ. एस. चेअरमन आणि डीन यांचे रिमार्क घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. गाईड विद्यापीठाच्या बाहेरचे असल्यामुळे त्यांना मान्यता देवू शकत नाही. |
| | | • या विद्यापीठाच्या बाहेरची गाईडशिप घेतली असेल तर त्यांना लेखी खुलासा देण्याविषयी असे कळविले आहे का? | होय कळविलेले आहे. |
| | | • कोणत्या नियमानुसार? | महाराष्ट्र शासनाच्या पत्रानुसार कळविले आहे. |
| | **श्रीमती विभूते एस. बी.** | | **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | ३६ | सोलापूर विद्यापीठ परिपत्रक सोविसो/परीक्षा विभाग/ २०१३-५७७ दि.१८ जून २०१३ नुसार विद्यार्थ्यांच्या (अनुऊत्तीर्ण) परीक्षेला बसण्याच्या संधी कमी करण्यात विद्यार्थ्यांचे हीत आहे काय? | त्यात विद्यार्थ्यांचं अहित नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • यात विद्यार्थ्यांचे कोणते हित आहे?<br><br>• विद्यार्थ्याला दिलेल्या नैसर्गिक संधी कमी करणे विद्यापीठाच्या हिताचे आहे काय?<br><br>• शिक्षणशास्त्र एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी सदरचा नियम लागू आहे का? | हित आणि अहित ही subjective term आहे. जसं आपण ठरवणार, जर एका वेळेस जास्तीत जास्त पेपर दिले तर ते अहित आहे. जर आपण त्याला परीक्षेच्या संधी जास्त दिल्या तर एका वेळेस त्याचे मागचे राहिलेले पेपर सगळे देत गेला तर एकूण स्कोर कमी होतो त्या अहित होतं. पण तेच जर कमी विषय असतील तर त्याचा स्कोर वाढेल त्यात विद्यार्थ्यांच हित होईल.<br>आपण विद्यापीठाचं हित पाहत नाही. विद्यार्थ्यांसाठी एकूण काय आहे ते पाहतो. जास्त पेपर दिले तर मार्कस् कमी होतात. त्यामुळे नवीन पध्दती विद्यार्थ्यांच्या हिताची आहे.<br>नाही. |
| | ३७ | एखाद्या महाविद्यालयातील प्राध्यापकाला नियमबाह्य वागणूक दिल्याचे व्यवस्थापन परिषदेपुढे सिध्द् झाल्याने व्यवस्थापन परिषदेने सदरचे प्रकरण संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या व प्राध्यापकाच्या लेखी आश्वासनानंतर निकाली काढले असतांना स्टॅट्यूट - 216A नुसार चौकशी समितीसाठी विद्यापीठ संबंधीत महाविद्यालयाला कोणत्या नियमानुसार वारंवार प्रतिनिधी विद्यापीठाकडून देत आहे? | विद्यापीठ प्रतिनिधी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| | ३८ | कांही अनुदानित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची निवड करतांना निवड समितीने API पुर्ण करण्याच्या अटीवर निवड करुन मान्यतेसाठी विद्यापीठाकडे शिफारस केली आहे काय?<br>• API पूर्ण असेल तरच छाननी समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराची मुलाखत घ्यावी असा नियम आहे का?<br>• संगमेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्याची नेमणूक करताना समितीने ही प्रक्रिया पूर्ण केली आहे काय? | नाही.<br><br>होय<br><br>संगमेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या निवड समितीने API पूर्ण करण्याची अटीवर शिफारस केलेली नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- | --- |
| | | • संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यास मान्यता देताना त्याचा API बरोबर असल्याचे verification केव्हा केले आहे? | संबंधित महाविद्यालयास प्राचार्यांचे approval देताना API लक्षात घेण्यात आलेला आहे. |
| | | • अशी प्रक्रिया पूर्ण न करता API पूर्ण करण्याच्या व API verification न करता व API नियमाप्रमाणे बसत नसल्याचे पुरावे दिल्यास विद्यापीठ निवड समितीवर कारवाई करणार का? | जर आपला प्रश्न संगमेश्वर महाविद्यालयाशी संबंधित असेल तर ज्यावेळेस त्यांची नेमणूक झाली त्यावेळी API लागू नव्हता. विद्यापीठाने त्यावेळी डिटेलिंग सुरु होते. |
| | | • विना अनुदानित महाविद्याल-याच्या प्राचार्य निवड समितीने प्राचार्यांची निवड API नुसार केली आहे काय? | विना अनुदानित महाविद्यालयास याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)